महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र.
२४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : eb@mpcb.gov.in

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

कल्पतरु पाँईट, २ रा मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

जा.क्र.मप्रनि/ आस्था/ब-७८९ दिनांक १३ /०२/२०२५

** तात्पुरत्या निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवारांकरिता सूचना * *

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या
निवडसूचीत नमूद उमेदवारांच्या प्रमाणपत्र/कागदपत्रे पडताळणीबाबत

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सरळसेवा भरतीमधील **गट 'ब'** व **गट 'क'** मधील संवर्गाची पदनिहाय निवडसूची IBPS या संस्थेकडून घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणानुक्रमाच्या तसेच सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेऊन व गुणानुक्रमे तात्पुरती निवडसूची (प्रतिक्षायादीसह) मंडळाच्या संकेतस्थळावर दिनांक १३/०२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तात्पुरती निवडसूची व प्रतिक्षायादीत समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी संबंधील पदासाठी लागू असलेले तसेच ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड केलेले दस्तऐवज / प्रमाणपत्रे जसे शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जाती वैधता प्रमाणपत्र, वयासंबंधीचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र आणि इतर सर्व मूळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह खालील नमूद ठिकाणी व वेळी समक्ष उपस्थित रहावे.

अ.क्र.	संवर्ग	दस्तऐवज पडताळणी दिनांक व वेळ	स्थळ
१	२	३	४
१	कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी	दिनांक २७/०२/२०२५ सकाळी ९.००	महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाँईट, ४ था मजला, कॉन्फरन्स हॉल, शीव-माटुंगा स्किम रोड क्र. ८, शीव सर्कलजवळ, शीव (पूर्व), मुंबई ४०० ०२२
२	कनिष्ठ वैज्ञानिक सहायक		
३	प्रयोगशाळा सहायक		
४	प्रमुख लेखापाल	दिनांक २८/०२/२०२५ सकाळी ९.००	
५	विधी सहायक		
६	वरिष्ठ लिपिक		
७	कनिष्ठ लिपिक/टंकलेखक		

कागदपत्रे /प्रमाणपत्रे पडताळणीच्या वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा उदा. आधारकार्ड, पॅन कार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. आरक्षित जागेकरिता अर्ज केला असल्यास त्या पुष्ठयर्थ आवश्यक असणारी सर्व मूळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

सदर उमेदवारांनी सोबत आणावयाच्या कागदपत्रे/प्रमाणपत्रांची यादी खालील तक्त्यात दिलेली आहे.

अ.क्र.	कागदपत्रे/ प्रमाणपत्रे
१	अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र (विहीत नमुन्यात)
२	शैक्षणिक अर्हतेचा पुरावा
३	वयाचा पुरावा (जन्म दाखला / इयत्ता १० वी. चा शाळा सोडल्याचा दाखला)
५	आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा (सक्षम प्राधिकारी दाखला)
६	राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधीत प्रवर्गाचे जात/जात वैधता प्रमाणपत्र
७	नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (चालू आर्थिक वर्षातील)
८	पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा
९	पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा
१०	खेळाडूंसाठी आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा
११	अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा
१२	महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र
१३	महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिका-यांचा विहित नमुन्यातील दाखला
१४	विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा
१५	मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा (इ. १० वी उत्तीर्ण प्रमाणपत्र)
१६	लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन (विहित नमुन्यात)
१७	पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन असल्याबाबतचे प्रमाणपत्र
१८	MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र
१९	टंकलेखन प्रमाणपत्र (आवश्यक असेल तेथे)
२०	अनुभव प्रमाणपत्र(संबंधित आस्थापना / HR विभागाचे) ज्या पदांकरिता अनुभव आवश्यक आहे अथवा अनुभवास प्राधान्य आहे, अशा पदांकरिता उमेदवाराने अनुभव नमूद केला असल्यास— १. नियुक्ती आदेश २. अनुभव प्रमाणपत्र

खालील परिस्थितीत उमेदवारांना निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व त्याबाबत उमेदवारांच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१. कागदपत्रे/प्रमाणपत्र पडताळणीनंतर उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास

२. कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीसाठी अपूर्ण दस्तऐवज/प्रमाणपत्र असल्यास तसेच चुकीची कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास, कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीसाठी

उपरोक्त दिवशी जे उमेदवार उपस्थित राहणार नाहीत, अशा उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही, असे गृहीत धरुन त्यांची निवड रद्द केली जाईल व त्यानंतर अशा उमेदवारांच्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीसाठी उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.

कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणी प्रक्रियेबाबत मंडळाचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील.

(डॉ. अविनाश ढाकणे, भा.प्र.से.)
सदस्य सचिव